माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.३२००/२२/अ.क्र.५८८५/२५/०१

**श्री. विलास अनंत लाड**
१९, मिशन कंपाऊड, रुम नं. १६,
ऑगस्ट क्रांती मार्ग, नानाचौक,
मुंबई – ४००००७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक डी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड,नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डी विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त,
डी विभाग कार्यालय, महापालिका कार्यालय इमारत, दुसरा मजला,
जोबनपुत्र कंपाऊंड,नाना चौक, ग्रँट रोड, मुंबई ४०० ००७.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०९.२०२५</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक डी विभाग, श्री. संतोष ठाकूर उपस्थित आहे. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता डी विभाग अनुपस्थित आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपीलार्थी यांनी दि. १९.०४.२०२२ रोजी जोडपत्र-अ च्या अनुषंगाने "शाळेचे प्लेग्राऊंड काढून तेथे गाडी पार्कींगसाठी शेड केले आहे" त्याबाबत आठ मुद्यांच्या माहितीची मागणी केली आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ नुसार माहिती कळविण्यात आली आहे. अपीलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून "अपीलार्थी यांना अपेक्षित असलेली माहिती अपीलार्थी यांनी लेखा क्रमांक सादर केल्यास उपलब्ध करुन देण्यात यावी", असे आदेश पारित करुन प्रथम अपील अर्ज निकाली काढण्यात

आला आहे. अपीलार्थी यांनी प्रथम अपील आदेशानंतर माहिती प्राप्त झाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील अर्ज दाखल केला आहे.

आज सुनावणी दरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक डी विभाग, श्री. संतोष ठाकूर यांनी असे विशद केले की, अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती संकलीत करुन तयार ठेवण्यात आली आहे.

सदर प्रकरणी विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक डी विभाग यांनी अपीलार्थी यांना कार्यालयातील अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या २ (च) नुसार साक्षांकित करुन माहिती अधिकाराच्या सही शिक्कासह विनामुल्य नोंदणीकृत टपालाने तात्काळ पाठविण्यात यावी. या निर्देशासह सदर द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०९.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra